# दुचाकी चोरणारा अट्टल चोरटा पोलीस स्टेशन सेवाग्राम येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात

फिर्यादी नामे मेहमुद मुस्ताक शेख, रा. जुनि वस्ती सेवाग्राम हे कस्तुरबा रुग्णालय सेवाग्राम येथे नोकरी करित असुन ते त्यांचे मालकीची हिरो स्प्लेंडर प्रो. क्र. एमएच-३२/एए-७३२० ने नेहमी प्रमाणे ड्युटीवर गेले व त्यांची मोटारसायकल स्टाफ पार्कींग येथे पार्क करुन ड्युटीवर गेले व ड्युटी संपल्यानंतर फिर्यादी त्यांना पार्किंगमध्ये त्यांची मोटारसायकल दिसुन न आल्याने फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन सेवाग्राम येथे तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन सेवाग्राम येथे अप. क्र. १२८/२०२२ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून गुन्हे प्रकटीकरण पथकाने पोलीस स्टेशन परिसरात गुप्त बातमीदार नेमुन गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती प्रमाणे आरोपी नामे सुहास प्रभाकरराव मोरे, वय ४५ वर्ष, रा. बाभुळगाव (कोंगा), ता. सेलू, जि. वर्धा यास अटक करुन त्याचे जवळुन वर नमूद गुन्ह्यातील चोरीस गेलेली मोटार सायकल एमएच-३२/एए-७३२०किमंत ३०,०००/- रु जप्त करण्यात आली. तसेच आरोपीस सखोल विचारपूस केली असता आरोपीने पोलीस स्टेशन सेवाग्राम हद्दीमधुन आणखी दोन गाड्या हिरो प्लेंडर क्र एमएच-३२/एएफ-४२९१ कि.३०,०००/- रु. ची तसेच एमएच-३२/एच-५८०८, कि. २०,०००/- रु. ची चोरल्याची कबुली दिली तसेच आर्वी नाका परिसरातुन हिरो प्लेंडर क्र. एमएच-३२ एफ-३२२० कि. २०,०००/- रु. तसेच महिला आश्रम परिसरातुन होन्डा फँशन प्लस विना नंबरची बंद स्थितीतली इंजिन क्र. 06A08M03842 कि.१०,०००/- रु. अशा एकुण ५ मोटारसायकल जप्ती करुन १) पोलीस स्टेशन सेवाग्राम अप. क्र. १२८/२०२२ कलम ३७९ भादंवि, २) सेवाग्राम येथे अप. क्र. १२९/२०२२ कलम ३७९ भादंवि., ३) सेवाग्राम येथे अप. क्र. ६३५/२०२१ कलम ४०६ भादंवि, ४) पोलीस स्टेशन वर्धा शहर अप. क्र. ४४०/२०२१ कलम ३७९ भादंवि. अन्वये एकूण ४ गुन्हे उघडकीस आणले आहे. सदर आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री निलेश ब्राम्हणे पोलीस स्टेशन सेवाग्राम यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार हरिदास काकड, गजानन कठाणे, जयेश डांगे, पवन झाडे, अभय ईगळे नेमणुक पोलीस स्टेशन सेवाग्राम तसेच सायबर शाखेचे निलेश कट्टोजवार यांनी केली.